| | | सुनावणीचा दि. 15.09.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 1 | 1244/ 2024 | श्रीमती. संगीता मनोज परदेशी, रा. रायगड-1, सारा वैभव जटवाडा रोड, छत्रपती संभाजीनगर | नायब तहसिलदार (महसुल-1), तहसिल कार्यालय छत्रपती संभाजीनगर | तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर | |
| 2 | 7670/ 2024 | श्री. अमोल युवराज सोनवणे, रा. ताकडगाव रोड, गेवराई ता. गेवराई जि. बीड | पोलीस उप अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर | अप्पर पोलीस अधिक्षक, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर | |
| 3 | 4381/ 2024 | श्री. सय्यद सादेक आसद अली, रा. कारंजा रोड लाईन गल्ली बीड | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय बीड | मुख्याधिकारी, नगर परिषद बीड | |
| 4 | 5717/ 2024 | ॲड. सुधार ज्ञानोबाराव खाडे, रा. विद्यानगर (पश्चिम), जेल रोड साईबाबा हॉस्पिटल समोर, बीड | बांधकाम विभाग, नगर परिषद बीड | मुख्याधिकारी, नगर परिषद बीड | |
| 5 | 8209/ 2024 | श्री. सुधीर ज्ञानेबाराव खाडे,रा. विद्यानगर (पश्चिम), जेल रोड, साईबाबा हॉस्पिटीलसमोर, बीड | नगर रचना विभाग, नगर परिषद कार्यालय बीड | मुख्याधिकारी, नगर परिषद बीड | |
| 6 | 5227/ 2024 | श्री. विजय रंगनाथ साळवे, रा. सम्राट अशोकनगर, माजलगाव ता.माजलगांव जि. बीड | ज.मा.अ. नगर परिषद कार्यालय, माजलगाव जि. बीड | मुख्याधिकारी, नगर परिषद माजलगाव जि. बीड | |
| 7 | 4431/ 2024 | श्री. विठ्ठल तुकाराम जाधव, मु.पो.घाटनांदुर ता. अंबाजोगाई जि. बीड | सचिव, श्री. सोमेश्वर शिक्षण संस्था घाटनांदुर ता. अंबाजोगाई जि. बीड | अध्यक्ष, श्री. सोमेश्वर शिक्षण संस्था घाटनांदुर ता. अंबाजोगाई जि. बीड | |
| 8 | 9722/ 2024 | श्री. शाम श्रीपती बडे, रा. बोधीघाट अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड | ज.मा.अ. स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अंबाजोगाई जि.बीड | ज.अ.अ. स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय अंबाजोगाई जि.बीड | |
| 9 | 2295/ 2024 | श्री. संभाजी धनराज यादव, रा. हिवरा (खु), पो. सो. बोरगाव ता. अंबाजोगाई जि. बीड | उप कार्यकारी अभियंता, महाविरण कार्यालय 33 के.व्ही उपकेंद्र परिसर, विभागीय कार्यालय अंबाजोगाई जि. बीड | अति. कार्यकारी अभियंता, महाविरण कार्यालय 33 के.व्ही उपकेंद्र परिसर, विभागीय कार्यालय अंबाजोगाई जि. बीड | |
| 10 | 6130/ 2024 | श्री. संभाजी धनराज यादव, रा. हिवरा (खु), पो. सो. बोरगाव ता. अंबाजोगाई जि.बीड | उप कार्यकारी अभियता, महावितरण अंबोजोगाई जि. बीड | कार्यकारी अभियता, महावितरण अंबोजोगाई जि. बीड | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 15.09.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 11 | 9920/ 2024 | श्री. सिध्देश्वर मधुकर कुंडे, रा. धानोरा (बु), ता. अंबाजोगाई जि. बीड | उपअभियंता, जलसंपदा यांत्रिकी उपविभाग अंबाजोगाई जि. बीड | कार्यकारी अभियंता यांत्रिकी जलसंपदा विभाग बीड | |
| 12 | 1586/ 2024 | श्री. विजय ज्ञानोबा साळवे, रा. मु.पो. फुले पिंपळगाव ता. माजलगा जि. बीड | मुख्यालय सहाय्यक उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यलय, माजलगाव जि. बीड | उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यलय, माजलगाव जि. बीड | |
| 13 | 1586 A/2024 | श्री. विजय ज्ञानोबा साळवे, रा. मु.पो. फुले पिंपळगाव ता. माजलगा जि. बीड | मुख्यालय सहाय्यक उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यलय, माजलगाव जि. बीड | उप अधिक्षक भुमि अभिलेख कार्यलय, माजलगाव जि. बीड | |
| 14 | 1656/ 2024 | श्री. केलास भिमा जाधव, रा. घाटनांदुर ता. भुम जि. धाराशिव | समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद धाराशिव | जिल्हा समाज कल्याण अधिकारी, समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद धाराशिव | |
| 15 | 2180/ 2024 | श्री. सुभाष शिवराम मस्के, रा. जुन एस.पी. ऑफीस जवळ रिपोर्ट भवन शेजारी बीड | उप कार्यकारी अभियंता(विद्युत विभाग), सार्वजनिक बाधकाम विभाग, धाराशिव | कार्यकारी अभियंता(विद्युत विभाग), सार्वजनिक बाधकाम विभाग, धाराशिव | |
| 16 | 2291/ 2024 | श्री. आण्णासाहेब दिगंबर माने, रा. मुलान गल्ली तुळजापुर ता. तुळजापुर जि. धाराशिव | पोलीस निरीक्षक पोलीस स्टेशन तुळजापुर जि. धाराशिव | उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय तुळजापुर जि. धाराशिव | |
| 17 | 4360/ 2024 | श्री. वलीउल्ला बरकतुल्ला सय्यद, मु.पो. वेंबळी ता. जि. धाराशिव | जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र वक्फ बोर्ड दर्गा रोड, धाराशिव | मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र वक्फ बोर्ड पानचक्की, छत्रपती संभाजीनगर | |
| 18 | 4720/ 2024 | ॲड. प्रमिला परशराम पाटील, मु.पो. खेडे, ता. आजरा जि. कोल्हापुर | पोलीस निरीक्षक, पोलीस स्टेशन तुळजापुर जि. धाराशिव | उपविभागीय पोलीस अधिकारी, उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय तुळजापुर जि. धाराशिव | |
| 19 | 8274/ 2023 | श्री. विजय एन रिझवानी, रा. 37,भाग्यनगर, नांदेड-431605 | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वाजेगाव ता. जि. नांदेड | विस्तार अधिकारी, पंचायत समिती नांदेड | |
| 20 | 8277/ 2023 | श्री. विजय एन रिझवानी, रा. 37,भाग्यनगर, नांदेड-431605 | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वाजेगाव ता. जि. नांदेड | विस्तार अधिकारी, पंचायत समिती नांदेड | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

| | | सुनावणीचा दि. 15.09.2025 | | वेळ सकाळी 10.30 वा. | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र. | अपील क्र. | अपीलार्थीचे नाव व पत्ता | जन माहिती अधिकारी | प्रथम अपीलीय अधिकारी | शेरा |
| 21 | 8279/2023 | श्री. विजय एन रिझवानी, रा. 37,भाग्यनगर, नांदेड-431605 | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वाजेगाव ता. जि. नांदेड | विस्तार अधिकारी, पंचायत समिती नांदेड | |
| 22 | 8080/2023 | श्री. विजय एन रिझवानी, रा. 37,भाग्यनगर, नांदेड-431605 | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वाजेगाव ता. जि. नांदेड | विस्तार अधिकारी, पंचायत समिती नांदेड | |
| 23 | 517/2024 | श्री. विजय एन. रिझवाणी, 37, भाग्यनगर नांदेड | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, वाजेगाव जि. नांदेड | विस्तार अधिकारी, पंचायत समिती नांदेड | |
| 24 | 610/2024 | श्री. विजय एन. रिझवाणी, 37, भाग्यनगर नांदेड | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय वाजेगाव ता. जि. नांदेड | विस्तार अधिकारी, पंचायत समिती नांदेड | |
| 25 | 4563/2023 | श्री. एस.अहेमद अली सय्यद अली, रा. मोमीन पुरा किनवट ता. किनवट जि. नांदेड | गट शिक्षणाधिकारी कार्यालय, पंचायत समिती किनवट जि. नांदेड | गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती किनवट जि. नांदेड | |
| 26 | 4626/2023 | श्री. आशिष कंवलसिंग राठोड, रा. निराळा तांडा, ता. किनवट जि. नांदेड | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय निराळा तांडा ता. किनवट जि. नांदेड | विस्तार अधिकारी, पंचायत समिती किनवट जि. नांदेड | |
| 27 | 4627/2023 | श्री. आशिष कंवलसिंग राठोड, रा. निराळा तांडा, ता. किनवट जि. नांदेड | ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय निराळा तांडा ता. किनवट जि. नांदेड | विस्तार अधिकारी, पंचायत समिती किनवट जि. नांदेड | |
| 28 | 5467/2023 | श्री. सिकंदर गफार शेख मु.पो. चिखली ता. किनवट जि. नांदेड | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, चिखली (बु), ता. किनवट जि. नांदेड | विस्तार अधिकारी, पंचायत समिती किनवट जि. नांदेड | |
| 29 | 5380/2023 | श्री. शेख वाहेद शेख इमाम रा. नेहरुनगर, किनवट ता. किनवट जि. नांदेड | ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, गोकुंदा ता. किनवट जि. नांदेड | विस्तार अधिकारी, पंचायत समिती किनवट जि. नांदेड | |
| 30 | 0 | 0 | 0 | 0 | |
| | | सहाय्यकाचे नांव व स्वाक्षरी | | लघुलेखकाचे नांव व स्वाक्षरी | |

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १२४४/२०२४
बोर्ड क्र.०१

श्रीमती संगिता मनोज परदेशी,
रा.रायगड-१, सारा वैभव, जटवाडा रोड, छत्रपती संभाजीनगर — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा,
नायब तहसिलदार (महसूल-१),
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
तहसिलदार,
तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१३.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.१२.२०२३ | राज्य माहिती आयोगाचे आदेश अपील क्र.१४८/२०२२, सुनावणी दि.२१.०७.२०२३, जा.क्र.११८४३, दि.१३.१०.२०२३, आयोगाच्या आदेशानुसार आदेश प्राप्त झाल्यापासुन झालेल्या कारवाईबाबतचे संपूर्ण कागदपत्रे (टिपणीसह) आवक जावक रजिस्टर नोंदणी, त्याबाबत टिपणी, कार्यालयीन आदेश / पत्रव्यवहार यांच्या सर्व छायांकित प्रती मिळणेबाबत, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावर दि.०५.०२.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, माहिती उपलब्ध करुन देणेबाबत जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. तथापि या नंतरही जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, दिशाभूल करणारी व अपूर्ण माहिती दिली, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज रोजी सुनावणीकरिता जन माहिती अधिकारी अनुपस्थित असुन त्यांनी माहिती अर्जावरील कार्यवाहीचा कोणताही अभिलेख आयोगाच्या पटलावर सादर केलेला नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (म-१), तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा नायब तहसिलदार (म-१), तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जासंदर्भात विहित मुदतीत कार्यवाही केलेली नाही. त्यामुळे या प्रकरणी त्यांच्याकडुन अधिनियमातील कलम ७ (१) चा भंग झालेला आहे. म्हणून त्यांचेविरुध्द अधिनियमातील कलम १९ (८) (ग) व २० (१) च्या तरतुदीनुसार कार्यवाही का करण्यात येऊ नये ? याचा खुलासा त्यांनी व्दितीय अपील क्रमांक व सुनावणी दिनांकाच्या संदर्भासह **दि.१३.१०.२०२५ रोजी आयोगासमोर व्यक्तिशः** उपस्थित राहुन सादर करावा. जन माहिती अधिकारी यांनी नमूद दिनांकास खुलासा सादर न केल्यास त्यांना काहीही म्हणावयाचे नाही, असे गृहित धरुन त्यांचेविरुध्द वर नमूद केल्याप्रमाणे कार्यवाही अंतिम करण्यात येईल.
३. तहसिलदार, तहसिल कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
४. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र.-१२१०५ दिनांक :- २३/९/२०२५ नोंदणीकृत टपालाव्दारे

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ७६७०/२०२४**
**बोर्ड क्र.०२**

श्री.अमोल युवराज सोनवणे, — अपिलार्थी
रा.ताकडगाव रोड, गेवराई, ता.गेवराई, जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस उपअधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
अपर पोलीस अधीक्षक,
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर

**(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२२.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी तथा पोलीस उपअधीक्षक, श्री.सुरेश नाईकनवरे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक, श्री.शशीकांत सिंगारे उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २५.०५.२०२४ | पोलीस स्टेशन तलवाडा गु.र.नं.१३५/२०२४, कलम ७, ७-अ, १२ भ्र.प्र.अ. मधील माहिती मिळणे,<br>१. फिर्यादी तुषार वक्ते यांनी एसीबी कार्यालय बीड येथे कोणत्या नंबरवर फोन करुन तक्रार दिली तो नंबर त्या नंबरचा सीडीआर व एसडीआर,<br>२. दि.२१.०४.२०२४ रोजी सापळा पंचनामा करण्यात आला सदर सापळा पंचनाम्यामध्ये अँथ्रासीन पावडर लावणारे कर्मचारी सांगळे साहेब, मो.९८२३१९१२१६ यांचा सीडीआर व एसडीआर मिळणे, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे व सदरची माहिती स्वत:शी संबंधित प्रकरणातील असल्यामुळे

माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील प्रकरणात गुन्हा दाखल असुन तो तपासावर असल्याने अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (ज) मधील तरतुदीनुसार नाकारण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना दि.१९.०६.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत माहितीसंदर्भातील प्रकरण मा.न्यायालयासमोर न्यायप्रविष्ठ असुन अद्याप निर्णय अंतिम झालेला नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.०९.०७.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित करण्यात आलेला आहे. या निर्णयाव्दारे, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन, अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, मागणी केलेले कागदपत्र दिलेले नाहीत, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती चौकशी प्रकरणाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. सदरचे चौकशी प्रकरण मा.न्यायालयासमोर निर्णयाधिन असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान आयोगास अवगत केलेले आहे. या परिस्थितीत अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ८ (१) (ज) मधील तरतुदीनुसार देय होणार नाही. सबब, या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२६.०६.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर दि.०९.०७.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12552 दिनांक: 26/9/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४३८१/२०२४
बोर्ड क्र.०३

श्री.सय्यद सादेक आसद अली,
रा.कारंजा रोड, लाईन गल्ली, बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा रचना सहायक, नगर परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१९.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा रचना सहायक, श्री.बळीराम नामदेव मोहिते व प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, श्री.शैलेश फडसे उपस्थित आहेत. अपिलार्थी सुनावणीकरिता उशिराने उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०६.०२.२०२४ | बीड शहर नगर परिषद हद्दीत ओपन स्पेस जागा याची लिखीत माहिती देण्यात यावी, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, प्रस्तुत प्रकरणाची यापूर्वी आयोगासमोर दि.०३.०७.२०२५ रोजी सुनावणी आयोजित करण्यात आली होती. या सुनावणीदरम्यान आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना आयोगासमोर उपलब्ध करुन देण्याकरिता सोबत आणलेली आहे. सदरची माहिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी या नात्याने अपिलार्थीस उपलब्ध करुन देण्यात येईल.

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती

अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा रचना सहायक, नगर परिषद, बीड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (आज रोजी सोबत आणलेली माहिती), आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. मुख्याधिकारी, नगर परिषद, बीड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12553 दिनांक : 26/8/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५७१७ व ८२०९/२०२४ (०२)

अॅड.सुधीर ज्ञानोबाराव खाडे,
रा.विद्यानगर (पश्चिम), जेल रोड, साईबाबा हॉस्पिटलसमोर, बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
रचना सहायक,
नगर परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्याधिकारी,
नगर परिषद, बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२७.०५.२०२४ व दि.२६.०८.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर द्वितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा रचना सहायक, श्री.बळीराम नामदेव मोहिते व प्रथम अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, श्री.शैलेश फडसे उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ०४ | १९.०३.२०२४ | १. विद्यानगर (पश्चिम), बीड येथील रहिवासी नसलेल्या पण स्वत:च्या मालकीचा प्लॉट ज्याचा क्र.२७ व नगर परिषद बीड ने नोंदणी केलेला घर क्रमांक १-३-३२२ हा सौ हेमलता अश्रुबा पाटील (गुंड) यांचा व त्या ठिकाणी असलेले दोन मजली घर पाडून वर्ष २०२२-२०२३ मध्ये तेथे नव्याने बांधकाम करण्यात आले त्यास बांधकाम विभाग न.प. बीड ने कोणत्या प्रकारची व किती मजल्यांचे बांधकामाची परवानगी दिली त्या बाबत सविस्तर माहिती द्यावी व सदर बांधकाम परवानगी पत्राची प्रमाणित प्रत द्यावी व इतर ०२ मुद्यांवर माहिती, |
| ०५ | १५.०२.२०२४ | १. विद्यानगर (पश्चिम), बीड येथील रहिवासी नसलेल्या पण स्वत:च्या मालकीचा प्लॉट ज्याचा क्र.२७ व नगर परिषद बीड ने नोंदणी केलेला घर क्रमांक १-३-३२२ हा सौ हेमलता अश्रुबा पाटील (गुंड) यांचा व त्या ठिकाणी नगर रचना विभाग, न.प. बीड ने दिलेला बांधकाम परवानाचा प्रकार, एकुण बांधकाम जेवढ्या मजल्यांचे, सदर बांधकाम घर / व्यावसायिक बांधकाम परवानगी या बाबतची सविस्तर माहिती द्यावी व सदरील बांधकामास परवानगी देणाऱ्या अधिकाऱ्याचे संपूर्ण नाव, हुद्दा याबाबतची सविस्तर माहिती व इतर ०२ मुद्यांवर माहिती, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दोनही माहिती अर्जाव्दारे जवळजवळ सारखीच माहिती मागितलेली आहे. सदर मागणी केलेल्या मागणी केलेल्या माहितीपैकी बांधकाम नकाशाची माहिती वगळून उर्वरित संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना दि.१२.०९.२०२५ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिश: स्विकारुन, मुद्दा क्र.१ ची माहिती मिळाली, अशी पोच दिलेली आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. तथापि अपिलार्थी यांनी माहिती स्विकारुन पोच देताना मुद्दा क्र.१ ची माहिती मिळाली अशी पोच दिलेली आहे. वास्तविक अपिलार्थी यांना उपलब्ध करुन दिलेल्या माहितीशिवाय दुसरी कोणतीही माहिती कार्यालयात उपलब्ध नाही.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती दिली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात त्यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र.: 12554 दिनांक : 26/9/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५२२७/२०२४**
**बोर्ड क्र.०६**

श्री.विजय रंगनाथ साळवे, — अपिलार्थी
रा.सम्राट अशोक नगर, माजलगाव, ता.माजलगाव, जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी, : उत्तरवादी क्र.१
नगर परिषद, माजलगाव, जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा : उत्तरवादी क्र.२
मुख्याधिकारी,
नगर परिषद, माजलगाव, जि.बीड

**(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१७.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २०.०३.२०२४ | जानेवारी २०२० ते डिसेंबर २०२३ पर्यंतची गुंठेवारी नामांतर व बांधकाम परवानगी याबाबत जे प्रकरणे निकाली काढली आहेत त्यांच्या संचिका व आकारणी केलेल्या फिसच्या रकमा, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिला किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, सुनावणी न घेतल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आयोगास उद्देशुन लिहिलेल्या दि.०३.०७.२०२५ रोजीच्या निवेदनामध्ये, प्रथम अपील सुनावणी घेणे काही कारणास्तव बाबी असुन अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने प्रथम अपील सुनावणीसाठी १५ दिवसाचा अवधी देण्यात यावा, असे नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची तसेच मोघम स्वरुपाची असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री

मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे लक्ष मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12556 दिनांक : 26/9/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४४३१/२०२४
बोर्ड क्र.०७

श्री.विठ्ठल तुकाराम जाधव,
रा.घाटनांदुर, ता.अंबाजोगाई, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ सचिव,
श्री.सोमेश्वर शिक्षण संस्था, घाटनांदुर, ता.अंबाजोगाई, जि.बीड : उत्तरवादी क्र.१

२ अध्यक्ष,
श्री.सोमेश्वर शिक्षण संस्था, घाटनांदुर, ता.अंबाजोगाई, जि.बीड : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२२.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, संस्थेच्या वतीने प्रतिनिधी, श्री.दि.ना.फड, मुख्याध्यापक उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार संबंधित श्री.सोमेश्वर शिक्षण संस्था, घाटनांदुर, ता.अंबाजोगाई, जि.बीड या संस्थेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १०.०२.२०२४ | श्री.सोमेश्वर शिक्षण संस्थेच्या मालकी गट नंबर ७११.००.२० आर जमिनीमध्ये सभागृह व वर्ग खोल्यांचे एकुण किती बांधकाम केलेले आहे व २००१ पासुन आजपर्यंत सदर सभागृह इमारत व खोल्यास भाडे अथवा अनुदान किती मिळाले याची माहिती देणे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती संबंधित संस्थेने समाधानकारक दिली नसल्यामुळे आयोगाकडे व्दितीय अपील दाखल केलेले आहे. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित करण्यात यावे.

संबंधित संस्थेच्या वतीने उपस्थित प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अर्जदार यांनी श्री.सोमेश्वर शिक्षण संस्थेकडे माहिती अधिकारातंर्गत अर्ज सादर करुन माहितीची मागणी केलेली आहे. सदर संस्थेची सार्वजनिक न्याय नोंदणी कायद्यातंर्गत नोंदणी झालेली आहे. सदर शिक्षण संस्थेस प्रत्यक्ष अथवा अप्रत्यक्ष स्वरुपात शासनाचे कोणतेही अनुदान प्राप्त होत नाही. त्यामुळे या संस्थेस माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदी लागू होणार नाहीत. मात्र सदर संस्थेच्या अधिनस्त असलेल्या शाळेस शासनाचे अनुदान प्राप्त होत

असल्यामुळे अधिनस्त शाळेस माहिती अधिकार कायदा लागू आहे. असे जरी असले तरी अपिलार्थी यांच्या संस्थेस प्राप्त माहिती अधिकाराच्या अर्जाबाबत संस्थेच्या सचिवांनी सकारात्मक दृष्टीकोन ठेवुन दि.०९.०३.२०२४ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध माहिती व वस्तुस्थिती अपिलार्थीस अवगत केलेली आहे. सचिवांनी दिलेल्या अशा प्रतिसादाने अपिलार्थी यांचे समाधान न झाल्यामुळे त्यांनी संस्थेच्या अध्यक्ष यांचेकडे प्रथम अपील दाखल केलेले आहे. सदर प्रथम अपिलावर संस्थेचे अध्यक्ष यांनी दि.११.०४.२०२४ रोजी रितसर सुनावणी आयोजित करुन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, संस्थेच्या सचिवांनी वस्तुनिष्ठ माहिती दिली असल्याचा व याबाबत अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान समाधान व्यक्त केले असल्याचा निष्कर्ष काढुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, समाधानकारक माहिती न दिल्यामुळे, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी समाधानकारक माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. आज सुनावणीदरम्यान संस्थेच्या वतीने उपस्थित प्रतिनिधी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती व प्रथम अपील अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्यांचे अवलोकन केले असता, संबंधित संस्थेच्या सचिवांनी अपिलार्थी यांच्या माहिती अधिकाराच्या अर्जास अनुसरुन माहिती / वस्तुस्थिती अपिलार्थीस उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. ही बाब विचारात घेता, संबंधित सोमेश्वर शिक्षण संस्थेच्या अध्यक्ष यांनी अपिलार्थी यांच्या दि.१५.०३.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर दि.११.०४.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही. प्रसंगावशात, अपिलार्थी यांना संबंधित संस्थेच्या सचिवांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत काही तक्रार असल्यास यासंदर्भात त्यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12557 दिनांक : 26/9/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ९७२२/२०२४
बोर्ड क्र.०८

श्री.शाम श्रीपती बडे,
रा.बोधीघाट, अंबाजोगाई, ता.अंबाजोगाई, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
प्रशासकीय अधिकारी,
स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
प्राध्यापक व विभागप्रमुख,
जनऔषध वैद्यकशास्त्र विभाग, स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई, जि.बीड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.०४.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम,२००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, श्री.डी.एस.भोसले व प्रथम अपिलीय अधिकारी तथा प्राध्यापक व विभाग प्रमुख, डॉ.आर.सी.संबुटवार उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.११.२०२२ | स्वा.रा.ती.ग्रा.शा.वै.म. रुग्णालय अंबाजोगाई विभागातील शल्यवस्तुभांडार मध्ये भ्रष्टाचाराच्या अनुषंगाने झालेल्या विविध समितीच्या माध्यमातुन चौकशी करण्यात आलेल्या सर्व समितीचे अहवालाच्या प्रती व सर्व माहिती मिळणेबाबत, सन २०१२ ते आजतागायत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांचा मूळ माहितीचा अर्ज वैद्यकीय संचालनालय, मुंबई यांचेकडे सादर केलेला आहे. तथापि मागणी केलेली माहिती वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई या कार्यालयाशी संबंधित असल्यामुळे अपिलार्थी यांचा

माहितीचा अर्ज वैद्यकीय संचालनालयाकडुन वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, अंबाजोगाई या कार्यालयास हस्तांतरित करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक, मोठ्या कालावधीची व मोघम स्वरुपाची आहे. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती कार्यालयाच्या अधिनस्त निरनिराळ्या संकलनाकडुन एकत्रित / संकलित करुन देणे अपेक्षित होते. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती संकलिल / एकत्रित करुन दि.०३.०४.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस उपलब्ध करुन दिलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२७.०४.२०२३ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे. अपिलार्थी वारंवार माहिती अधिकारातंर्गत अर्ज सादर करुन एकाच विषयावर माहितीची मागणी करत आहेत. अपिलार्थी यांनी प्रस्तुत प्रकरणातील माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचा एक संच आज रोजी सोबत देखील आणलेला आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देण्यास टाळाटाळ केली, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची तसेच मोघम स्वरुपाची असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे लक्ष मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12558 दिनांक : 26/9/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २२९५ व ६१३०/२०२४ (०२)
बोर्ड क्र.०९ व १०

श्री.संभाजी धनराज यादव, — अपिलार्थी
रा.हिवरा खु., पो.सो.बोरगाव, ता.अंबाजोगाई, जि.बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
उपकार्यकारी अभियंता,
महावितरण, उपविभाग अंबाजोगाई, जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
अति.कार्यकारी अभियंता,
महावितरण, विभागीय कार्यालय, अंबाजोगाई, जि.बीड

(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२६.०३.२०२४ व दि.०३.०६.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| ०९ | २३.११.२०२३ | आपल्या कार्यालयातंर्गत येणाऱ्या कनिष्ठ अभियंता, महावितरण कार्यालय लोखंडी सावरगाव ता.अंबाजोगाई याच्या कार्यक्षेत्रातील ट्रान्सफार्मर सिंगल फेज व थ्री फेज, वाकलेले पोल, निसर्ग आपत्तीमुळे मोडलेले पोल, या कामांची माहिती, सन २०२१ ते आजतागायत, |
| १० | २९.१२.२०२३ | कनिष्ठ अभियंता, महावितरण लोखंडी सावरगाव या कार्यालयाच्या अंतर्गत असणाऱ्या मौ.सोमनाथ बोरगाव येथील ३ फेज डीपी वरील कनेक्शनची माहिती, सन २०२२-२३ ते आजतागायत, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिला किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दोन प्रथम अपिलावर अनुक्रमे

दि.२९.०१.२०२४ व दि.१८.०४.२०२४ रोजी सुनावणी घेऊन १५ दिवसात माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केलेले आहे. अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न दिल्याच्या नाराजीने, असे कारण नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांनी प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने त्यांचे दि.१६.०७.२०२५ रोजीचे निवेदन आयोगाच्या पटलावर सादर केलेले आहे. त्यामध्ये त्यांनी, अपूर्ण माहिती मिळाली असल्याचे व डिपीच्या कामामध्ये मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार झालेला असुन शासनाची दिशाभूल केली असल्याचे नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची तसेच मोघम स्वरुपाची असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत. या सर्व बाबी प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर सुनावणी घेऊन निर्णय पारित करताना विचारात घेतल्या असल्याचे दिसुन येत नाही.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे लक्ष, मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे. प्रसंगावशात, माहितीची मागणी करण्यामागे किंवा जन माहिती अधिकारी यांच्याकडुन प्राप्त झालेल्या माहितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात त्यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. १२५५९ दिनांक : २६/९/२०२५

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ९९२०/२०२४
बोर्ड क्र.११

श्री.सिध्देश्वर मधुकर कुर्डे,
रा.धानोरा बु., ता.अंबाजोगाई, जि.बीड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
उपअभियंता,
जलसंपदा यांत्रिकी उपविभाग, अंबाजोगाई, जि.बीड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
उपकार्यकारी अभियंता,
जलसंपदा यांत्रिकी विभाग, नगर रोड, जायकवाडी वसाहत, बीड — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.११.११.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता, श्री.आशिष विद्याधर रोकडे उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १६.०८.२०२४ | दि.०१.०१.२०१५ ते दि.१६.०८.२०२४ पर्यंत,<br>१. अंबाजोगाई उपविभागास मनुष्यबळ पुरवणारी संस्था किंवा एजन्सी यांना कोणत्या निकषांवर किंवा नियमावर काम दिले जाते, शासकीय अधिसुचना, जीआर सत्यप्रत करुन द्यावे,<br>२. अंबाजोगाई उपविभागास मनुष्यबळ, कामगार पुरवणारी संस्था किंवा एजन्सी याची सविस्तर माहिती आणि नमूद कालावधीत आपल्या कार्यालयाने संस्थेला किंवा एजन्सीला दिलेली रक्कम आणि कामगार संख्या अनुसार प्रत्येक महिना स्टेटमेंट सत्यप्रत करुन द्यावे,<br>३. अंबाजोगाई उपविभागातंर्गत सर्व कंत्राटी कामगाराचे पगार स्लिप आणि शासकीय जीआर प्रत सत्यप्रत करुन द्यावे,<br>४. अंबाजोगाई उपविभागांतर्गत कामास असलेल्या सर्व कंत्राटी कामगाराचे पीएफ, ईएसआयसी नंबर आणि प्रत्येक महिन्याला जमा करत असलेले रक्कमेची स्टेटमेंट सत्यप्रत करुन द्यावे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात देय होणाऱ्या माहितीकरिता दि.०५.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, माहितीपोटीच्या रु.१६६/- इतक्या अधिक पोस्टाचे शुल्क रु.३०/- अशा एकुण रु.१९६/- इतक्या शुल्काचा भरणा करणेबाबत अपिलार्थी यांना सूचित करण्यात आलेले आहे. अपिलार्थी यांना सुचित केल्याप्रमाणे त्यांनी विहित शुल्काचा भरणा केल्यानंतर दि.२०.०९.२०२४ रोजीच्या पत्रान्वये, अपिलार्थी यांनी मागणी केलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी ८३ पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना नोंदणीकृत टपालाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.२३.१०.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली असल्याची बाब विचारात घेऊन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती देणे, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्योच अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे. त्यामुळे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२३.१०.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12560 दिनांक :- 26/9/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १५८६ व १५८६ अे/२०२४ (०२)**
**बोर्ड क्र.१२ व १३**

श्री.विजय ज्ञानोबा साळवे, — अपिलार्थी
रा.फुले पिंपळगाव, ता.माजलगाव, जि.बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
मुख्यालय सहायक,
उपअधीक्षक भूमि अभिलेख कार्यालय, माजलगाव, जि.बीड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
उपअधीक्षक,
भूमि अभिलेख, माजलगाव, जि.बीड

**(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२८.०२.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा मुख्यालय सहायक, श्री.सोनवणे लक्ष्मण अर्जुन व प्रथम अपिलीय अधिकारी तथा उपअधीक्षक, श्री.सानप उध्दव पांडुरंग उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| १२ | ३०.०८.२०२३ | केंद्रीय माहिती अधिकार २००५ कलम ३ अन्वये मोजणी र.क्र.८९३, जावक क्र.१०८, दि.११.०२.२०२३ या आशयाच्या नोटीस आधारे गट क्र.१८ केसापुरी येथे दि.०२.०३.२०२३ रोजी झालेल्या ८१ आर क्षेत्राच्या मोजणीसंदर्भात माहिती, १. ८१ आर क्षेत्रापैकी ताब्यात किती क्षेत्र संबंधित शेतकऱ्याकडे आहे, २. ८१ आर क्षेत्रापैकी संबंधित शेतकऱ्याकडे किती क्षेत्र कमी आहे, ३. ८१ आर क्षेत्रातील जमिन लगत / शेजारच्या शेतकऱ्याकडे किती आर निघाली आहे, |
| १० | ०७.०८.२०२३ | केंद्रीय माहिती अधिकार २००५ कलम ३ अन्वये गट क्र.१८ केसापुरी येथे दि.०२.०३.२०२३ रोजी झालेल्या मोजणी संदर्भात इत्यंभुत माहिती मिळणे, पाच मुद्यांवर, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी त्यांच्या दोनही माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती सारखीच आहे. अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने दि.२१.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये प्रतिसाद देऊन, मागणी केलेली माहिती यापूर्वी दि.०९.०८.२०२३ रोजीच्या पत्रान्वये उपलब्ध करुन दिली असल्याचे व मो.र.८९३ च्या मोजणी संचिकेची आवश्यकता असल्यास नियमाप्रमाणे होणारी मोजणी फीस भरणा करुन मोजणी संचिका प्राप्त करुन घ्यावी, असे अपिलार्थी यांना कळविलेले आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे प्रथम अपिलीय अधिकारी यांनी निर्देशित केल्याप्रमाणे दि.१८.१२.२०२३ रोजीच्या पत्रान्वये वस्तुस्थितीदर्शक माहिती अपिलार्थी यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता अपिलार्थी अनुपस्थित आहेत. तथापि त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती अधिकाऱ्यांनी माहिती उपलब्ध केली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती / वस्तुस्थिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसून येत आहे. प्रसंगावशात, जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध करुन दिलेल्या माहिती / वस्तुस्थितीबाबत अपिलार्थी यांची काही तक्रार असल्यास या संदर्भात त्यांनी संबंधित सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र तक्रार अर्ज करुन त्याबाबत पाठपुरावा करणे संयुक्तिक ठरेल.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12561 दिनांक 26/9/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक १६५६/२०२४**
**बोर्ड क्र.१४**

श्री.कैलास भिमा जाधव,
रा.घाटनांदुर, ता.भूम, जि.धाराशिव — अपिलार्थी

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा,
जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
समाज कल्याण विभाग, जिल्हा परिषद, धाराशिव — : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०४.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २८.११.२०२३ | १. शेळी गट लाभार्थी निवड यादी इतिवृत्ताची प्रत मिळणेबाबत सन २०१८ ते २०२३ पर्यंतची, भूम व परंडा तालुका,<br>२. शेळी गट यांची विमा उतरवलेली यादी व कागदपत्र,<br>३. वृध्द कलावंत मानधन योजनेतंर्गत निवड झालेले इतिवृत्त यादी पत्र मिळणेबाबत, धाराशिव जिल्ह्याची,<br>४. अनुदानित वसतीगृह दिलेली अनुदान मुल्यनिर्धारणाची यादी पत्र असेसमेंटची प्रत सन २०१८ ते २०२३ पर्यंतची सर्व कागदपत्रे मिळणेबाबत, धाराशिव जिल्ह्याची, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद दिला किंवा कसे याचा कोणताही बोध आयोगापुढील कागदपत्रावरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती काहीच न मिळाल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाचे अवलोकन केले

असता, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत, व्यापक व मोठ्या कालावधीची तसेच मोघम स्वरुपाची आणि एका पेक्षा अधिक विषयाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. अशी माहिती एकत्रित करण्याकरिता सार्वजनिक प्राधिकरणाकडील मनुष्यबळ व साधन सामग्री मोठ्या प्रमाणावर वळवावी लागते, ही बाब माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम ७ (९) नुसार योग्य ठरत नाही. यामुळे असा माहितीचा अर्ज व्यवहार्य ठरत नाही. कारण माहिती अधिकारामागील भूमिका व उद्दिष्ट सफल होत नाहीत. महाराष्ट्र माहिती अधिकार नियम (पहिली सुधारणा) २०१२ नुसार अपिलार्थी यांना एका माहिती अर्जामध्ये एका विषयावर माहिती अनुज्ञेय आहे.

प्रस्तुत प्रकरणाच्या अनुषंगाने सर्व संबंधितांचे लक्ष मा.सर्वोच्च न्यायालयाने सेंट्रल बोर्ड ऑफ सेकंडरी एज्युकेशन व इतर विरुध्द आदित्य बंडोपाध्याय व इतर अपील नं.६४५४/२०११ या प्रकरणात दि.०९.०८.२०११ रोजी पारित केलेल्या निर्णयाकडे वेधण्यात येत आहे. या निर्णयामध्ये मा.सर्वोच्च न्यायालयाने माहिती अधिकाराचा योग्य वापर होणेबाबत लक्ष वेधलेले आहे. याचाही सर्वांनी विचार करणे आवश्यक आहे, असे आयोगाचे मत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12562 दिनांक : 26/9/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक २१८०/२०२४
बोर्ड क्र.१५

श्री.सुभाष शिवराम मस्के, — अपिलार्थी
रा.जुने एस.पी. ऑफिस जवळ, रिपोर्टर भवन शेजारी, बीड

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.१
उपकार्यकारी अभियंता (विद्युत विभाग),
सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
कार्यकारी अभियंता (विद्युत विभाग),
सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव

(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२०.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.०१.२०२४ | कार्यकारी अभियंता सा.बां. विद्युत विभाग धाराशिव कार्यालयातंर्गत कार्यरत उपअभियंता सा.बां. विद्युत उपविभाग बीड या कार्यालयास देण्यात आलेले कार्यारंभ आदेश व देयक अदा केलेली छायांकित प्रतीत माहिती देणे, दि.०१ मार्च २०२३ ते दि.०८ जानेवारी २०२४, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलाथी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध कागदपत्रावरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, चुकीचे दिशाभूल करणारे पत्र, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता (विद्युत विभाग), सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व

अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. कार्यकारी अभियंता (विद्युत विभाग), सार्वजनिक बांधकाम विभाग, धाराशिव यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

---

जा.क्र. 12563 दिनांक : 26/9/2025

राज्य माहिती आयोग
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
सत्यमेव जयते

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक २२९१/२०२४**
**बोर्ड क्र.१६**

श्री.आण्णासाहेब दिगंबर माने, — अपिलार्थी
रा.मुलान गल्ली, तुळजापूर, ता.तुळजापूर, जि.धाराशिव

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा, : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, तुळजापूर, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२६.०३.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.विजय एस.थोटे, पोलीस उपनिरीक्षक, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.बालाजी दत्तु जाधव, पो.हे.कॉ. उपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १९.०१.२०२४ | मोबाईल लोकेशन तपासाबाबत, सि.आर.नं.१९५/२३ केसबाबत, |

अपिलार्थी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, माहिती अर्जान्वये मागणी केलेली माहिती मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे व सदरची माहिती स्वत:शी संबंधित प्रकरणातील असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील प्रकरणात गुन्हा दाखल असुन तो तपासावर असल्याने अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (ज) मधील तरतुदीनुसार नाकारण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना दि.१२.०२.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत माहितीसंदर्भातील प्रकरण मा.न्यायालयासमोर न्यायप्रविष्ठ असुन अद्याप निर्णय अंतिम झालेला नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी दि.०७.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन, अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती नाकारल्याने, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती चौकशी प्रकरणाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. सदरचे चौकशी प्रकरण मा.न्यायालयासमोर निर्णयाधिन असल्याचे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान आयोगास अवगत केलेले आहे. या परिस्थितीत अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ८ (१) (ज) मधील तरतुदीनुसार देय होणार नाही. सबब, या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२०.०२.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर दि.०७.०३.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही. सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12569 दिनांक : 26/9/2025

सत्यमेव जयते
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४३६०/२०२४
बोर्ड क्र.१७

श्री.वलीउल्ला बरकतुल्ला सय्यद,
रा.बेंबळी, ता.जि.धाराशिव — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
जिल्हा वक्फ अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, दर्गा रोड, धाराशिव — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
मुख्य कार्यकारी अधिकारी,
महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, छत्रपती संभाजीनगर — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१८.०४.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| १६.१०.२०२३ | दि.२०.०२.२०२२ ते आजपावेतो,<br>१. मौजे बेंबळी ता.जि.उस्मानाबाद (धाराशिव) येथील वक्फ संस्था दर्गा हजरत जिंदालाल, लाल शहाबादच्या कमिटी (योजना) यांनी आपल्या मार्फतीने शासकीय योजनांचा लाभ घेतला त्याचा तपशिल कळवावा,<br>२. अ.क्र.१ मध्ये नमूद कमिटीने दर्गाच्या नावे असलेल्या स्थावर मिळकतीतुन भाडेपट्टा, खरेदी विक्री इ. व्यवहाराच्या मार्गाने मिळविलेल्या लाभाचा तपशिल द्यावा, |

प्रस्तुत प्रकरणात, आज रोजी सुनावणीकरिता कोणीही उपस्थित नाहीत. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या माहिती अर्जास प्रतिसाद देऊन माहिती उपलब्ध करुन दिली किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध कागदपत्रावरुन होत नाही. मात्र अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती मिळाली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

## आदेश

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा जिल्हा वक्फ अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, दर्गा रोड, धाराशिव

यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत, एक दिवस निश्चित करुन अवलोकनास्तव उपलब्ध करुन द्यावी. अवलोकनानंतर अपिलार्थी यांनी चिन्हांकित केलेली ५० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थी यांना ५० पेक्षा अधिक पृष्ठांच्या माहितीची आवश्यकता असल्यास उर्वरित माहिती सशुल्क उपलब्ध करुन देण्यात यावी.

२. मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य वक्फ बोर्ड, पानचक्की, छत्रपती संभाजीनगर यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12565 दिनांक : 26/9/2025

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४७२०/२०२४**
**बोर्ड क्र.१८**

अॅड.प्रमिला परशराम पाटील, — अपिलार्थी
रा.खेडे, ता.आजरा, जि.कोल्हापूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पोलीस निरीक्षक,
पोलीस स्टेशन, तुळजापूर, जि.धाराशिव

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — उत्तरवादी क्र.२
उपविभागीय पोलीस अधिकारी,
उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, तुळजापूर, जि.धाराशिव

**(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.०२.०५.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.विजय एस.थोटे, पोलीस उपनिरीक्षक, प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी, श्री.बालाजी दत्तु जाधव, पो.हे.कॉ./१५३१ उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २२.१२.२०२३ | डॉ.पवन शिवाजीराव पाटील यांचे मृत्यू संदर्भातील माहिती, माहे ऑक्टोबर २०२३ ते आज तारखेपर्यंतची,<br>डॉ.पवन शिवाजीराव पाटील, रा.बोरगावकर कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नळदूर्ग रोड, तुळजापूर यांचा दि.१४.१०.२०२३ रोजी मृत्यू झाला आहे,<br>१. त्यांचे मृत्यूनंतर केलेला पंचनामाची प्रत, २. त्यांचे मृत्यूनंतर सदर चौकशी दरम्यान घेतलेले सर्वांचे जाबजबाब, ३. मृत्यूनंतर केलेला पोस्टमार्टम रिपोटची प्रत, ४. सदर कामातील आपले पोलीस स्टेशनकडे असलेले इतर सर्व कागदपत्रे, |

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भातील प्रकरण तपासावर प्रलंबित असल्याने अपिलार्थी यांनी

माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ८ (१) (ज) मधील तरतुदीनुसार नाकारण्यात येत असल्याचे अपिलार्थी यांना दि.१०.०१.२०२४ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना कळविण्यात आलेले आहे. सद्यस्थितीत माहितीसंदर्भातील प्रकरण मा.न्यायालयासमोर न्यायप्रविष्ठ असुन अद्याप निर्णय अंतिम झालेला नाही.

प्रथम अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी दि.०८.०३.२०२४ रोजी सुनावणी घेऊन निर्णय पारित केलेला आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, अपिलार्थी यांनी मागणी केलेल्या माहितीसंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन, अपिलार्थी यांचे प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, खोटी, चुकीची व दिशाभूल करणारी उत्तरे देऊन माहिती देण्याचे टाळले, असे कारण नमूद केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती चौकशी प्रकरणाशी संबंधित असल्याचे दिसुन येत आहे. सदरचे चौकशी प्रकरण मा.न्यायालयासमोर निर्णयाधिन असल्याचे जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी आज रोजी सुनावणीदरम्यान आयोगास अवगत केलेले आहे. या परिस्थितीत अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना अधिनियमातील कलम ८ (१) (ज) मधील तरतुदीनुसार देय होणार नाही. सबब, या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती, त्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांनी दिलेला प्रतिसाद व अधिनियमातील तरतुदी याचा सारासार विचार करता, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२०.०२.२०२४ रोजीच्या प्रथम अपिलावर दि.०८.०३.२०२४ रोजी पारित केलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आवश्यकता आयोगास दिसुन येत नाही.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12566 दिनांक : 26/9/2025

राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ८२७४, ८२७७, ८२७९, ८०८०/२०२३, ५१७ व ६१०/२०२४ (०६)

बोर्ड क्र.१९ ते २४

श्री.विजय एन.रिझवानी,
रा.३७, भाग्यनगर, नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, वाजेगाव, ता.जि.नांदेड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, नांदेड — : उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२६.१२.२०२३ (०४) व दि.१५.०१.२०२४ (०२) रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये सहा द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

प्रस्तुत प्रकरणात आज रोजी सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांचे अपील क्र.८२७४, ८२७७, ८२७९/२०२३, ५१७/२०२४, ६१०/२०२४ मधील दि.११.०८.२०२५ रोजीचे व अपील क्र.८०८०/२०२३ मधील दि.०७.०८.२०२५ रोजीचे लेखी निवेदन आयोगासमोर आहे. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी, मागणी केलेली आवश्यक माहिती मिळाली असल्यामुळे सदरचे अपील उचलून घेत असल्याचे (मागे घेत असल्याचे) नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांचे उपरोक्त दि.०७.०८.२०२५ व दि.११.०८.२०२५ रोजीचे लेखी निवेदन विचारात घेता, विचाराधिन सहा व्दितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत:, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त सहा व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहित्ती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12485 दिनांक : 25/9/2025

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ४५६३/२०२३
बोर्ड क्र.२५

श्री.एस.अहेमद अली सय्यद अली,
रा.मोमीनपुरा, किनवट, ता.किनवट, जि.नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
पर्यवेक्षक,
जवाहेरुल उलुम उर्दू प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, किनवट, ता.किनवट, जि.नांदेड

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
मुख्याध्यापक,
जवाहेरुल उलुम उर्दू प्राथमिक, माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, किनवट, ता.किनवट, जि.नांदेड

(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.१२.०७.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा पर्यवेक्षक, श्री.शेख युनुस शेख मोहिद्दीन उपस्थित आहेत. अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती एकत्रित / संकलित करण्याकरिता काही कालावधी लागलेला आहे. सदर एकत्रित / संकलित केलेली माहिती अपिलार्थी यांना दि.१३.०९.२०२५ रोजी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी व्यक्तिश: प्राप्त करुन घेऊन पोच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात सुनावणीच्यावेळी अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशुन लिहिलेले दि.१३.०९.२०२५ रोजीचे लेखी निवेदन आयोगासमोर आहे. या निवेदनामध्ये अपिलार्थी यांनी माहिती मिळाली असल्याचे व याबाबत कोणतीही तक्रार नसल्याचे नमूद केलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात, जन माहिती अधिकारी यांचा उपरोक्त युक्तिवाद व अपिलार्थी यांचे दि.१३.०९.२०२५ रोजीचे लेखी निवेदन विचारात घेता, विचाराधिन द्वितीय अपील निकाली काढण्याचा निर्णय आयोग घेत आहे.

अत: आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12486 दिनांक : 25/3/2025

**राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील**

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ४६२६ व ४६२७/२०२३ (०२)**
**बोर्ड क्र.२६ व २७**

श्री.आशिष केवलसिंग राठोड,
रा.निराळा तांडा, ता.किनवट, जि.नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायत अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, निराळा तांडा, ता.किनवट, जि.नांदेड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, किनवट, जि.नांदेड — उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.१७.०७.२०२४ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये दोन द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री.यु.आर.तुपकर व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं) श्री.व्ही.जे.वाघमारे (वर्तमान), श्री.एन.एम.मुंडनर (तत्कालीन) उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दोन जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| बोर्ड क्र. | माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|---|
| २६ | १२.०५.२०२३ | ग्रा.पं. कार्यालय निराळा तांडा अंतर्गत सन २०१० ते २०१७ या कालाधीत १५ वित्त आयोग या निधीतुन व इतर विकास निधीतुन ग्रा.पं. कार्यालयामार्फत व टेंडर प्रक्रियेतुन बाह्य एजन्सीव्दारे झालेल्या संपूर्ण कामाचा तपशिल, कार्यारंभ आदेश, कॅशबुक व ग्रा.पं. कार्यालय निराळा तांडा येथील बँक खात्याच्या विवरण पत्राची प्रमाणित प्रत मिळणे, |
| २७ | १६.०५.२०२३ | १.ग्रामपंचायत कार्यालय निराळा तांडा अंतर्गत पाणीपट्टी, घरपट्टी, कोंडवाडा, बाजार कर व इतर प्रकारचे कर सन २०१०-२०२३ या काळात जमा झालेल्या एकुण कराची वर्ष निहाय यादी व कराच्या पावती बुकाचे प्रमाणित प्रत मिळणे, २. ग्रामपंचायत कार्यालय निराळा तांडा अंतर्गत सन २०१०-२०२३ या काळात विविध कराच्या माध्यमातुन जमा झालेल्या कराच्या पैशाचा विनिमय कसा व कुठे करण्यात आला, या संबंधी दस्ताऐवजासहीत माहिती मिळणे, |

जन माहिती अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची आहे. अपिलार्थी यांनी त्यांच्या माहिती अर्जामध्ये व्यक्तिश: माहिती हवी असल्याचे नमूद केलेले आहे. अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्यामुळे अशी माहिती एकत्रित / संकलित करण्यास काही कालावधी लागलेला आहे. अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि.०४.०७.२०२३ रोजी सुनावणी घेऊन माहिती उपलब्ध करुन देण्याचे आदेशित केलेले आहे. सदर प्रथम अपिलाच्या निर्णयास अनुसरुन दि.२०.०७.२०२३ रोजीच्या पत्रासोबत अपिलार्थी यांना आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली दोनही माहिती अर्जातील जवळजवळ १२०० पृष्ठांची माहिती अपिलार्थी यांना व्यक्तिश: उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. सदरची माहिती अपिलार्थी यांनी दि.२१.०७.२०२३ रोजी व्यक्तिश: प्राप्त करुन घेऊन, सर्व माहिती मिळाली, अशी पोच दिलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती प्राप्त झालेली नाही, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे व अपिलार्थी यांनी माहिती प्राप्त करुन घेऊन माहिती मिळाली असल्याबाबत पोच दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

उपरोक्त दोन व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. १२५८७ दिनांक : 25/9/2025

सत्यमेव जयते

## राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक ५४६७/२०२३
बोर्ड क्र.२८

श्री.सिकंदर गफार शेख,
रा.चिखली, ता.किनवट, जि.नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा
ग्रामपंचायात अधिकारी,
ग्रामपंचायत कार्यालय, चिखली बु., ता.किनवट, जि.नांदेड — : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा
विस्तार अधिकारी (पंचायत),
पंचायत समिती, किनवट, जि.नांदेड — उत्तरवादी क्र.२

(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)

अपिलार्थी यांनी दि.२८.०८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी तथा ग्रामपंचायत अधिकारी, श्री. यु.डी.देशमुखे व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं) श्री.के.एच.गायकवाड उपस्थित आहेत. अपिलार्थी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| ०८.०६.२०२३ | १. ग्रा.पं.चिखली बु. ता.किनवट येथील सहायक ग्रामरोजगार सेवक यांची नियुक्ती दि.०५.०४.२०२३ रोजी व ठराव क्र.१२ नुसार निवड प्रक्रिया ठराव ग्रामसभा व मासिक सभा कोणत्या सभेत ठराव पास करण्यात आला, ठराव व प्रोसेडिंगची सत्यप्रत मिळणे,<br>२. ज्या सहायक ग्रामरोजगार सेवकाची नियुक्ती केली आहे त्याची वय मर्यादा व शैक्षणिक पात्रता व आपत्य प्रमाणपत्र लहान कुटुंबाचे प्रमाणपत्र सत्यप्रत मिळणे,<br>३. ज्या सहायक रोजगार सेवकाची निवड दि.०५.०४.२०२३ पूर्वीचे शासन निर्णय ची सत्यप्रत मिळावी,<br>४. सहायक रोजगार सेवकाची स्वाक्षरी नमुना व प्रस्तावावर सही करणे व अधिकार आपल्या कार्यालय मार्फत देण्यात आले असेल तर अधिकार पत्राची सतयप्रत मिळणे,<br>५. सहायक रोजगार सेवक निवड करण्याची परवानगी वरिष्ठ अधिकारी कार्यालय मार्फत |

| | घेण्यात आली काय सत्यप्रत मिळणे, |
|---|---|

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थी यांनी मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती दि.०७.०७.२०२३ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थी यांना व्यक्तिश: उपलब्ध करुन देण्याचा प्रयत्न केला असता, अपिलार्थी यांनी माहिती घेण्यास नकार दिलेला आहे. याबाबत पंचासमक्ष पंचनामा करण्यात आलेला आहे. अपिलार्थी यांनी माहिती स्विकारली नसल्यामुळे दि.१६.१२.२०२३ रोजी, अपिलार्थी यांना माहिती अर्जानुसार आवश्यक असलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, माहिती न मिळाल्याबाबत, असे कारण नमूद केलेले आहे. आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादात अवगत केल्याप्रमाणे माहिती अर्जावरील कार्यवाहीची कागदपत्रे आयोगाच्या पटलावर सादर केलेली आहेत. त्याचे अवलोकन केले असता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना माहिती उपलब्ध करुन दिली असल्याचे दिसुन येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12567 दिनांक : 26/9/2025

सत्यमेव जयते
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

# राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
बचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

**द्वितीय अपील क्रमांक ५३८०/२०२३**
**बोर्ड क्र.२९**

श्री.शेख वाहेद शेख इमाम,
रा.नेहरुनगर, किनवट, ता.किनवट, जि.नांदेड — अपिलार्थी

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा, ग्रामपंचायत अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, गोकुंदा, ता.किनवट, जि.नांदेड : उत्तरवादी क्र.१

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, किनवट, जि.नांदेड : उत्तरवादी क्र.२

**(सुनावणी दिनांक १५.०९.२०२५)**

अपिलार्थी यांनी दि.२४.०८.२०२३ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजीचा सुनावणीसाठीचा बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व प्रथम अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं), श्री.निवृत्ती माधव मुकनर उपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

| माहिती अर्जाचा दिनांक | माहिती अर्जातील विषय |
|---|---|
| २३.०२.२०२३ | आपल्या कार्यालयात सादर अर्ज दि.०९.०२.२०२३ विषय - मौ.गोकुंदा शेत स.नं.६/१ मधील प्लॉट क्र.२२ मालमत्ता क्र.१००/२ ही न्यायालय निर्णय नुसार मेराजबी शेख इमाम यांचे नावे करणेबाबत आपल्या कार्यालयाकडुन केलेल्या कार्यवाहीचा तपशिलमधील कागदपत्रके मिळणेबाबत,<br>१. अर्जदार यांनी सादर केलेला अर्ज व अर्जामधील मागणी व सोबत जोडलेल्या न्यायालयीन निकाल पत्राप्रमाणे आपल्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीची माहिती,<br>२. वरील नमूद मालमत्ता ही आजमितीस कोणाच्या नावे आहे व ती कोणत्या कागदपत्रके आधारेचे ते मालमत्ता धारक आहेत त्याबाबतचे कागदपत्रकांच्या छायांकित प्रतीत देणेबाबत, |

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, माहिती अर्जानुसार मागणी केलेली माहिती

अद्याप मिळालेली नाही. सदर माहितीची आवश्यकता असल्यामुळे माहिती अर्जानुसार मागणी केल्याप्रमाणे माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणीदरम्यान अवगत केले की, अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय पारित केला किंवा कसे याचा कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. तसेच कार्यरत जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली किंवा कसे याचाही कोणताही बोध उपलब्ध संचिकेवरुन होत नाही. अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली व कार्यालयात उपलब्ध असलेली माहिती / वस्तुस्थिती आयोगाने निर्देशित केल्याप्रमाणे वर्तमान जन माहिती अधिकारी उपलब्ध करुन देतील, ही बाब प्रथम अपिलीय अधिकारी या नात्याने व्यक्तिश: पाहण्यात येईल.

प्रस्तुत प्रकरणात, अपिलार्थी यांनी आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये, कोणताही पत्रव्यवहार केला नाही, असे कारण नमूद केलेले आहे. तसेच आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी माहिती मिळाली नसल्याबाबत अवगत केलेले आहे. या प्रकरणी अपिलार्थी यांनी माहिती अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थी यांना सत्वर प्राप्त व्हावी या दृष्टीकोनातून माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८) (क) (दोन) नुसार विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, किनवट, जि.नांदेड यांना या प्रकरणी आयोगातर्फे जन माहिती अधिकारी म्हणून निश्चित करण्यात येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

**आदेश**

१. आयोगातर्फे निश्चित जन माहिती अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, किनवट, जि.नांदेड यांनी, अपिलार्थी यांच्या जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती, आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, नोंदणीकृत टपालाव्दारे अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.
२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, जि.नांदेड यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.
३. उपरोक्त निर्देशासह अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 12568 दिनांक : 26/9/2025

प्रत :- आवश्यक कार्यवाहीकरिता,
गट विकास अधिकारी, पंचायत समिती, किनवट, जि.नांदेड